# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ०१–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. बबन राजाराम सातपूते ,<br>रा. येळवी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## <u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. बबन राजाराम सातपूते, रा. येळवी, ता. जत, जि. सांगली यांनी वितरण कंपनीकडे आपल्या शेतीपंपासाठी नवीन विद्युत पुरवठा मिळावा म्हणून दि. ११.५.२००९ रोजी अर्ज केला व त्याची फी रु. ५०/– त्याचदिवशी भरली आहे. तक्रारदार यांस आजतागायत चलन मिळाले नाही. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. २१.१२.२००९ रोजी रितसर तक्रार दाखल केली.

कक्षाने दिनांक ३०.१२.२००९ रोजी आदेश पारित केले. प्रस्तुतच्या तक्रारीद्वारे मंचाकडून विलंबापोटी भरपाई मिळावी अशी विनंती केली आहे.

वि.प.ने आपल्या दि. २०.२.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदाराचा अर्ज दि. ११.५.२००९ रोजी मिळाल्याचे मान्य केले व त्यांस दि. ६.२.२०१० रोजी चलन देण्यात आले आहे व ०.१८ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम करावे लागते असे म्हटले आहे.

सदरची तक्रार मंचासमोर दि. ८.३.२०१० रोजी सुनावणीस घेतली असता, तक्रारदार गैरहजर. प्रतिनिधी दिलेले नाहीत. श्री. अे.के. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग व श्री. दिवटे, सहाय्यक अभियंता, संख उप विभाग उपस्थित. वि.प.तर्फे चाचणी अहवाल मिळाल्यानंतर कनेक्शन देण्यात येईल व ३ पोलचे काम आहे असे प्रतिपादन केले. तक्रारदारास चलन देण्यास झालेल्या विलंबाबाबत वि.प.तर्फे कुठलेही स्पष्टीकरण देण्यात आले नाही. त्यामुळे वि.प. तक्रारदारास भरपाई देण्यास जबाबदार आहे तरी ती मिळावी अशी प्रतिनिधींनी विनंती केली. खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदारास भरपाई बाबत आदेश देणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

<u>कारणमिमांसा</u>

उभयबाजूंच्या लेखी कथनानुसार तक्रारदार यांनी शेतीपंपासाठी विद्युत पुरवठा मागणी अर्ज दिनांक ११.५.२००९ ला केल्याचे मान्य केले आहे व त्यांस अंतर्गत कक्षाचा आदेश दि. ३०.१२.२००९ रोजी पारित झाल्याचे मान्य आहे. तक्रारदार यांस दि. ६.२.२०१० रोजी चलन देण्यात आले. त्यामुळे दि. १०.६.२००९ ते दिनांक ६.२.२०१० या काळातील २८ आठवड्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. २८००/– देण्यास वि.प. जबाबदार आहे व तो मिळण्याचा तक्रारदारास हक्क आहे. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी टेस्ट रिपोर्ट मिळाल्यानंतर व ३ पोलचे काम करुन कनेक्शन देण्यात येईल असे म्हटले आहे. तथापि विलंबा बाबत हा कांही संयुक्तिक खुलासा होवू शकत नाही. कृती मानके विनियमातील तरतुदीप्रमाणे भरपाई देणेस वि.प जबाबदार आहे. खालील प्रमाणे आदेश –

ग्राहक तक्रार निवारण मंचाचे अध्यक्षांचे पद दिनांक ३.९.२००९ ते २०.१०.२००९ व सदस्य यांचे पद दि. १.९.२००९ पासून दि. २.११.२००९ पर्यंत रिक्त राहिल्याने मंच कार्यान्वित नसल्याने १०० पेक्षा अधिक प्रकरणांची सुनावणी व निर्णय प्रलंबित राहिल्याने ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००५, क्र. ५:१ चे तरतुदीनुसार सदर अपिलावर असलेल्या दोन महिन्यांचे मुदतीत निर्णय करणे शक्य झाले नाही.

## <u>आदेश</u>

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वि.प.ने तक्रारदार यांस दि. १०.६.२००९ ते ६.२.२०१० या २८ आठवडे विलंबाच्या कालावधीसाठी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. २८००/– भरपाई द्यावी.

३) सदर रकमेचे बिलातून समायोजन करण्यात यावे.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार य ांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ६.४.२०१० ( बी. जी. पवार )

अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :